पृथ्वीराज बी.पी. (भा.प्र.से.)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त**

**अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट) कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका**
पुणे म.न.पा. भवन, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.
दूरध्वनी क्र. : ०२०-२५५०१४६३
E-mail : addmce@punecorporation.org

जा. क्र. : अति. म-आ. (इ)/पर्या/८३७ दिनांक : 15.12.2025

**बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी हवा गुणवत्ता तपासणी प्रणाली बसविणेबाबतचे परिपत्रक**

राज्यातील अनेक शहरांमध्ये पी.एम २.५ आणि पी. एम. १० या धुलीकणांमुळे वायू प्रदूषण वाढत असल्याने राज्य सरकारकडून मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या दि.२/११/२०२३ रोजी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६, कलम ५ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी सेन्सर-आधारित हवा गुणवत्ता तपासणीसाठी प्रणाली उभारणे आवश्यक आहे. एआरएआय (ARAI,२०२२) च्या अहवालानुसार, बांधकाम क्षेत्र हे धूळ उत्सर्जनात प्रमुख योगदान देणारे क्षेत्र आहे. त्यामध्ये पीएम१० धूलिकणांची पातळी जवळपास २३% आहे. यानुसार बांधकामाच्या ठिकाणी धूळ नियंत्रित करणेसाठी अत्यावश्यक बाब आहे.

वरील बाबींच्या अन्वये पुणे महानगरपालिकेने हवा गुणवत्ता सेन्सर उत्पादकांना इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेटेरॉलॉजी (IITM), पाषाण, पुणे येथे सह-स्थान अभ्यास (Co-location Study) करण्यास सूचित केले होते. त्यान्वये उपकरणांसाठीची आवश्यक तांत्रिक वैशिष्ट्ये परिशिष्ट-अ मध्ये देण्यात आली असून IITM च्या सह-स्थान अभ्यास द्वारे लघुसूचित करण्यात आलेले सेन्सर मेक आणि मॉडेल्सची यादी परिशिष्ट- ब मध्ये देण्यात आली आहे.

सदर परिपत्रकान्वये पुणे महानगरपालिकेद्वारे निर्देश देण्यात येतात की, पुणे महानगरपालिका हद्दीतील बांधकाम क्षेत्रफळ ५००० चौरस मीटर (Built-up Area) व त्याहून अधिक क्षेत्रफळ असलेल्या सर्व खाजगी व सार्वजनिक निवासी आणि व्यावसायिक बांधकाम प्रकल्पांमध्ये तसेच सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये (Infrastructure Projects), बांधकामाच्या ठिकाणी पी.एम.(PM)२.५ आणि पीएम (PM) १० मोजण्यासाठी सेन्सर-आधारित हवा गुणवत्ता देखरेख प्रणाली स्थापित करण्यात यावी. तसेच धूळ प्रदूषण तीव्रता दर्शविण्यासाठी एलईडी इंडिकेटर (LED Signal) प्रणाली बसविण्यात यावी, ज्यामुळे बांधकामाच्या ठिकाणावरील कर्मचाऱ्यांना तेथील हवेच्या गुणवत्तेची स्थिती समजून घेता येईल आणि त्यानुसार प्रदूषण कमी करणेसाठी त्वरित उपाययोजना करता येतील.

पुणे शहरातील बांधकामाच्या ठिकाणी बसविण्यात येणारे सदरचे सेन्सर हे परिशिष्ट – अ मध्ये दिलेल्या तांत्रिक वैशिष्ट्यांनुसार असावेत. परिशिष्ट - ब मध्ये देण्यात आलेल्या सेन्सर उत्पादकांमधून सूचीबद्ध केलेल्या मेक आणि मॉडेलमधून निवडलेले असणे बंधनकारक आहे तसेच सेन्सर उत्पादकांची सुधारित यादी वेळोवेळी पुणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. बांधकामाच्या ठिकाणी बसविण्यात येणाऱ्या सेन्सरमधून उपलब्ध होणारी हवा-गुणवत्ताबाबतची वास्तविक माहिती पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या देखरेखीसाठी केंद्रीयकृत हवा गुणवत्ता संकेतस्थळावर एकत्रित केली जाईल.

सर्व बांधकाम व्यावसायिकांना परिशिष्ट - क नुसार हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. याशिवाय, एलईडी इंडिकेटर (LED Signal) प्रणालीद्वारे दर्शविण्यात येणाऱ्या धूळ तीव्रता पातळीनुसार कृती मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्यात यावे.

सर्व विद्यमान व नवीन सुरू होणाऱ्या प्रकल्पांनी (क्षेत्रफळ ५००० चौरस मीटर व अधिक) हे **परिपत्रक** प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हवा गुणवत्ता देखरेख प्रणाली आणि एलईडी इंडिकेटर (सिग्नल) बांधकामाच्या ठिकाणी बसवावेत. नवीन बांधकाम प्रकल्पांच्या बाबतीत, १५ दिवसांचा कालावधी हा बांधकामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष कोणतेही कामकाज सुरु झाल्याच्या दिनांकापासून गृहीत धरण्यात येईल.

सदर परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन न केल्यास कारणे दाखवा नोटीस / काम थांबवण्याचे आदेश आणि लागू असलेली इतर दंडात्मक कारवाई केली जाईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

सोबत :-

- **परिशिष्ट-अ :-** बांधकाम ठिकाणांवर बसविण्यात येणाऱ्या हवा गुणवत्ता देखरेख प्रणालीची आवश्यक तांत्रिक वैशिष्ट्ये.
- **परिशिष्ट-ब :-** IITM च्या सह-स्थान अभ्यास द्वारे लघुसूचित करण्यात आलेले सेन्सर मेक आणि मॉडेल्सची यादी.
- **परिशिष्ट-क :-** बांधकाम व्यावसायिकांसाठी हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजना व धूळ तीव्रता पातळीनुसार कृती मार्गदर्शक तत्वे.

15/12/25

(पृथ्वीराज बी. पी.)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका